सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मुलतवी/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३६४ ठ. क्र. ३३३ दि. २३/२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरामध्ये प्र.क्र. ४८ कुमठे गांव येथील हिंदू स्मशानभूमी मध्ये विविध सुधारणा करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. ३५, सन २०१५-१६ र.रु. ३५,४८,८७२/- इतकेचे तयार केले असून, सदर पूर्वगणनपत्रकास व बजेट तरतूदीस मा. स्थापत्य समितीची मंजूरी मिळून त्यास मा. सर्वसाधारण सभेची अंतीम मंजूरी मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. २-२-१६ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २०८, दि. ५-२-१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रकरणी सन २०१५-१६ चे भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यामधील अ.क्र. २२ स्मशानभूमी सुधारणा करणे या सदरी तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.३६५ ठ. क्र.३३४
दि. २३।२।१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरामध्ये प्र.क्र. ५१, कुमठे गाव स.नं. ४३ (१अ३) येथील मुस्लीम कब्रस्थान मध्ये विविध सुधारणा करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. ३६, सन २०१५-१६ र.रु. २८,४१,५७५/- इतकेचे तयार केले असून, सदर पूर्वगणनपत्रकास व बजेट तरतूदीस मा. स्थापत्य समिती मंजूरी मिळून मा. सर्वसाधारण सभेची अंतीम मंजूरी मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. २-२-१६ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २०९, दि. ५-२-१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रकरणी सन २०१५-१६ चे भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यामधील अ.क्र. २२ स्मशानभूमी सुधारणा करणे या सदरी तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे. आणि मोदी मुस्लीम कब्रस्तान येथील र.रुपये २५.०० लाखाचे पूर्वगणनपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३६६ ठ. क्र. ३३५
दि. २३/२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ६ ब घोंगडे वस्ती भवानी पेठ शिवनेरी व्यायाम शाळा लगत (हनुमान मंदिर लगत) वाचनालय व व्यायाम शाळा बांधण्याबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. ३४, सन २०१५-१६ र.रु. २८,३७,०३६/- इतकेचे तयार केले असून मुंबई प्रां.अधिनियम १९४९ मधील पृ.क्र.१२३ कलम ६६ मधील नमूद महानगरपालिकेस स्वेच्छानिर्णयानुसार तरतूद करता येईल अशा बाबी मधील अ.क्र. १ (अ) व २२ मधील नमूद प्रमाणे पूर्वगणनपत्रकास व सन २०१६-१७ मनपा भांडवली कामातून बजेट तरतूद करुन मिळणेस्तव मा. स्थापत्य समितीची मंजूरी मिळून मा.मनपा सर्वसाधारण सभेकडे अंतीम मंजूरी मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २-२-१६ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २१०, दि. ५-२-१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

याकामी सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रासंगो/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 398 ठ. क्र. 336
दि. 23/2/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



महावितरणाच्या ३३/११ के.व्ही. नवीन उपकेंद्रासाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव मा. सहा. संचालक नगर रचना यांचेकडील भाडेदर व जागेचे मुल्यदरानुसार महावितरण यांनी मागणी केलेल्या जागेचे भाडे व जागेची किंमत प्रस्तावात नमूद अ.क्र. १ ते ७ माहिती व तपशील दिले असून सदर जागेचे प्रती माह भाडे र.रु. ३,२०,०००/- व जागेची किंमत र.रु. २,६५,६०,०००/- इतके होत आहे. तरी मा. शासन निर्णय क्र. टी.पी.एस.-१७१०/६६५/प्र.क्र.२२३८/१०/सोलापूर नवी-१३ दि. ८-६-२०१२ चे निर्णयान्वये व महावितरण यांचेकडील पत्रानुसार मागणी केलेली जागा भाडेतत्वावर देणेकामी महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्नाची बाब विचारात घेता प्रस्तावात नमूद तक्त्यात नमूद शासकीय शिघ्रसिध्दगणका प्रमाणे होणारे प्रति माह र.रु. ३,२०,६००/- या प्रमाणे २९ वर्षे ९ महिने भाडे कराराने भाडयाने देणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील मालमत्ता विनियोग या प्रकरणातील कलम ७९ अन्वये मा. सर्वसाधारण सभेच्या धोरणात्मक निर्णयास्तव मा. आयुक्त यांचे दि. १५-२-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रासंगिक~~/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.399 ठ. क्र.334 दि. 23/2/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



पोलीस स्टेशन सलगरवस्ती मध्यवर्ती जागा उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव मा. पोलीस आयुक्त यांचेकडील पत्रात नमूद केलेप्रमाणे व तसेच पत्रासोबत जोडलेल्या नकाशाचे अवलोकन केले असता त्यांनी ९८१.९२ चौ. मी. इतकी जागा मागणी केलेली आहे. परंतू मा. सहा. संचालक नगर रचना यांचेकडील पत्रात नमूद प्रमाणे ११८१.९२ चौ.मी. जागा पोलीस स्टेशन करिता अनुज्ञेय आहे असे नमूद केले असून त्यामुळे राखीव असलेली संपूर्ण जागा देणे ईस्ट होणार आहे. मा. सहा.संचालक नगर रचना यांचेकडील प्रस्तावात नमूद तक्त्यामधील अ.क्र. १ ते ७ मध्ये माहिती व तपशील दिले असून सदर जागेचे प्रती माह भाडे र.रु. १,५८,८५०/- तसेच खुल्या जागेची किंमत र.रु. १,३१,५९,९४९/- इतके होत आहे. तरी संपूर्ण प्रकरणाचे अवलोकन केले असता पोलीस स्टेशन हे समाज उपयोगी उपक्रम असलेने यातून पोलीस खात्याला कोणत्याही प्रकारचे उत्पन्न मिळाणार नाही. तसेच सदरचे परिसरातील नागरिकांची सुरक्षा होणार आहे. तसेच कायदा व सुव्यवस्था टिकून राहील. यामुळे सलगरवस्ती पोलीस स्टेशनचे नवीन इमारत बांधकामासाठी ११८१.९२ इतक्या क्षेत्रफळाची मोकळी जागा ही मा. शासन निर्णय क्र. टी.पी.एस.-१७१०/६६५/प्र.क्र.२२३८/१०/सोलापूर नवी-१३ दि. ८-६-२०१२ चे निर्णयान्वये २९ वर्षे ९ महिने जागा नाममात्र भाडयाने हस्तांतरीत करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील मालमत्ता विनियोग या प्रकरणातील कलम ७९ अन्वये मा. सर्वसाधारण सभेच्या धोरणात्मक निर्णयास्तव मा. आयुक्त यांचे दि. १५-२-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रामुख्यो~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.३८४ ठ. क्र.३३६
दि. २३/२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र. ३७ येथील संतोष फोटो फ्रेम्स, गाळा नं. २ न्यू पाच्छा पेठ, अशोक चौक सोलापूर येथील दुकानात लाकडी गोल्डन फ्रेम, ॲल्युमिनीअम, फायबर फ्रेम, लायटींग फ्रेम व फोटो लॅमिनेशन असे सर्व कामे होत होती. गाळा नं. १ असलेल्या दुकानाला लागलेल्या शॉर्टसर्किटमुळे शेजारील गाळा नं. २ संतोष फोटो फ्रेम या दुकानास आग लागू दुकानातील फोटो काच, पोस्टर, पट्टया लाकडी फायबर पट्टया बॅटल बंडल, खुर्च्या कारपेट अनेक वस्तूची शॉर्टसर्किटमध्ये जळून खाक झाल्याने त्यांना एकूण १.०० लाख रुपयाचे नुकसान झालेले आहे तरी त्यांना मनपा कडून जास्तीत जास्त अर्थसहाय्य मिळावे. तरी संतोष फोटो फ्रेम्स यांना अर्थसहाय्य मिळणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या ~~तहकूब/मामुली~~/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४२२ ठ. क्र. ३३९
दि. ८/३/१६ .....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत विशेष उद्देश वाहन (स्पेशल परपज व्हेईकल) च्या स्थापनेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव केंद्र शासनाच्या प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार स्मार्ट सिटीचे अपेक्षित काम जलदगतीने पूर्ण होणेकरिता स्वतंत्र प्राधिकरण (Special Purpose Vehicle - SPV) स्थापन करणेबाबत सूचना प्राप्त आहेत. त्या अनुषंगाने सोलापूर शहराकरिता कंपनी ॲक्ट २०१३ मधील नमूद तरतूदीनुसार सादर केलेल्या स्मार्ट सिटी चॅलेंजच्या प्रस्तावात SPV चे प्रस्तावात नमूद प्रमाणे नियोजन करणेत आले आहे. प्रस्तावात नमूद सर्व वस्तुस्थितीचा साकल्याने विचार होवून केंद्र शासनाच्या प्राप्त मार्गदर्शक सूचनेनुसार प्रस्तावातील अ.क्र. १ ते ९ बाबीसंदर्भात शासन स्तरावर पत्रव्यवहार करणे, दुरुस्ती करणे व तद्अनुषंगीक बाबींवर निर्णय घेणे इ.बाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना देणेकरिता मा. सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ३-३-२०१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

१) एसपीव्हीचे प्रमुख उद्देश (कार्य आणि जबाबदा-या)

सोलापूर मनपाचे सशक्तीकरण करण्यासाठी कामकाजाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आणि त्याच्या कामकाजामध्ये नाविण्यता आणण्यासाठी विशेष उद्देश वाहनाची स्थापना करण्यात आली आहे. सोलापूर महानगरपालिकेचे कोणतेही हक्क किंवा अधिकार दुर्बल होणार नाहीत. दर निश्चित करण्याचे सोलापूर महानगरपालिकेचे अधिकार अबाधित राहतील. एसपीव्ही प्रकल्प अंमलबजावणी मधील काही स्वायत्तेसह सोलापूर महानगरपालिकेचे एक कार्यकारी अंग म्हणून कार्य करेल. यांस ही सभा मान्यता देत आहे.

२) कंपनी कायदा २०१३ अंतर्गत नोंदणीकृत होणा-या कंपनीचे नांव **सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कंपनी लिमीटेड** असे राहील. त्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच नांवात बदल करुन अन्य नावाने कंपनी नोंदणीकृत करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना देण्यांत येत आहे त्यास ही सभा मान्यता देत आहे.

३) विशेष उद्देश वाहन (SPV) च्या अनुषंगाने मा. आयुक्त यांचे दिनांक ३-३-२०१६ चे टिपणी सोबत दाखल केलेल्या आर्टिकल ऑफ असोसिएशनच्या मसुद्यास ही सभा मान्यता देत आहे.

४) विशेष उद्देश वाहन (SPV) च्या अनुषंगाने मा. आयुक्त यांचे दिनांक ३-३-२०१६ चे टिपणी सोबत दाखल केलेल्या मेमोरंडम ऑफ असोसिएशनच्या मसुद्यास ही सभा मान्यता देत आहे.

५) आर्टिकल ऑफ असोसिएशन आणि मेमोरंडम ऑफ असोसिएशन मधील मसुद्यास केंद्र शासन, राज्य शासन व रजिष्टार ऑफ कंपनी यांनी भविष्यात सुचविलेल्या दुरुस्ती आवश्यकतेप्रमाणे करणेस ही सभा मान्यता देत आहे.

६) सदर कंपनी अंतर्गत दर्शनी मुल्य रुपये १०/- असणा-या २५००० भाग असे एकूण रुपये २,५०,०००/- किंवा वेळोवेळी भविष्यात आवश्यक तेवढे अतिरिक्त भागभांडवल म्हणून गुंतवणूक करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यासाठी सोलापूर महानगरपालिकेतर्फे खालील सहा माननिय नामनिर्देशित भागधारक असतील. १) मा. महापौर २) मा. उपमहापौर ३) मा. अध्यक्ष, स्थायी समिती ४) मा. सभागृह नेता ५) मा. विरोधी पक्षनेता ६) मा. महानगरपालिका आयुक्त याप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

...२

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब/मामुली~~/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.४२३ ठ. क्र. ३४०
दि. ८/३/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना व सुधारणा कामे मजीप्रा मार्फत राबविणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सन २०३६ ची लोकसंख्या नुसार इंटरमिडियेट स्टेज विचारात घेवून योजना तयार करण्यांत आली. त्यानुसार मनपाने एकूण र.रु. १२४०.५६ कोटीचे मूळ प्रस्तावामधून पहिल्या टप्पाअंतर्गत र.रु. ६९५ कोटी रक्कमेचा सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठा व सुधारणा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन मा. संचालक तथा आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनालय वरळी मुंबई यांचेकडे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत निधी मिळणेस्तव व मंजूरीस्तव दि. ३०-८-२०१४ अन्वये सादर करण्यात आलेले आहे. यासाठी NTPC कडून उपलब्ध होणारे र.रु. २५०.०० कोटी म.न.पा. हिस्सा म्हणून वापरणेचा आहे.

सदरची योजना सोमपा मार्फत राबविणेस सोलापूर महानगरपालिकेकडे सक्षम तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सारख्या तज्ञ शासकीय यंत्रणे कडून किंवा अन्य सक्षम शासकीय यंत्रणे मार्फत राबविणे आवश्यक आहे. तरी सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठा व सुधारणा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण किंवा अन्य सक्षम शासकीय यंत्रणे मार्फत राबविणेकरिता मा. सर्वसाधारण सभेकडे पाठविणेस त्याप्रमाणे अधिकार मा. आयुक्त यांना देणेस याकामी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दिनांक ३-३-२०१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदरची योजना ही सोलापूर महानगरपालिकेच्या वतीनेच राबविण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर योजना राबविण्याकरिता मा. महाराष्ट्र शासनाकडील कार्यकारी अभियंता या दर्जाचा अधिकारी महानगरपालिकेकडे तातडीने नियुक्त करणेकामी ही सभा मा. महाराष्ट्र शासनास विनंती करीत आहे.

ही योजना गुणवत्तापूर्ण व्हावी याकरिता तज्ञ अधिका-यांची सेवा घेण्यांसही मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका